मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया (मराठी)

अंक ५ ● वर्ष १५ वे ● पृष्ठे ५२ ● मे - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक ५ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • मे २०१८

संपादक
राजेंद्र थोरात

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## कथा


- रावण व यमदेव युद्ध ०६
- खरे मित्र ०८
- शहाणी चिऊताई १४
- संस्कार ३५
- मनाची एकाग्रता ४२
- सुखाचा शोध ४५
- दिव्यत्वाची प्रचिती ४८





## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- राजा राममोहन रॉय ०५
- तेजस्विनी -७३ २०
- सुभेदार मेजर योगेंद्रसिंह २१
- दुर्गभ्रमंती २२
- बाबा हरदेवसिंहजींच्या ... ३१
- समर्थ दर्शन -४३ ३४
- बाबा गुरबचनसिंहजींचा... ३५
- आपले जिल्हे ४४
- पक्षीजगत ४७





## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- आली आली सुट्टी आली २९
- प्रिय आम्हाला हसती दुनिया ४३
- आई ४९

# नर सेवा नारायणपूजा

बाबा हरदेवसिंहजींनी आपल्या प्रवचनात एक गोष्ट सांगितली होती. महंमद पैगंबरसाहेब रोज सकाळी आपल्या शिष्यांना प्रबोधन करण्यासाठी मशीदित जात असत. त्याकाळी काही लोकांना त्यांची शिकवण आवडत नव्हती. ते त्यांना उघड उघड विरोध करत; तर काहीजण त्यांना त्रास देण्यासाठी नवीन-नवीन योजना आखत. त्याच गावात एक म्हातारी स्त्री राहत होती. ती देखील महंमद पैगंबरांचा द्वेष करायची. पैगंबरसाहेब रोज तिच्या माडीजवळूनच जात असत. एकदा ती सकाळी लवकर उठली. त्यांची येण्याची वाट पाहत माडीवर उभी राहिली. महंमद पैगंबरांची स्वारी तिच्या माडीजवळ येताच तिने कचऱ्याने भरलेला डबा त्यांच्या अंगावर रिकामा केला. पण अंगावर पडलेला कचरा झटकत काहीही न बोलता ते तसेच पुढे निघाले. दुसऱ्या दिवशीही तोच प्रकार घडला. याहीवेळी ते काहीच बोलले नाहीत. आता तर हा प्रकार रोजच घडू लागला. म्हातारीने वरुन कचरा टाकायचा नि महंमद पैगंबरांनी अंगावरचा कचरा झटकत पुढे जायचे.

एके दिवशी ते म्हातारीच्या माडीजवळून नेहमीप्रमाणे चालले होते; परंतु त्या दिवशी मात्र अंगावर कचरा पडला नाही. आश्चर्याने त्यांनी वर पाहिले. तिथे त्यांना म्हातारी दिसली नाही. ते जिना चढून माडीवर गेले. म्हातारी आपल्या खोलीत खाटेवर झोपली होती. त्यांनी आस्थेने तिला विचारले, "माई, काय झालंय? तब्येत बरी नाही का तुझी?" त्यांनी तिच्या कपाळावर हात ठेवला. ती तापाने फणफणत होती. पैगंबरसाहेबांनी तिच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवल्या. हकीमाला बोलावून तिला औषध दिले.


म्हातारीच्या डोळ्यातून पश्चातापाचे अश्रू वाहू लागले. ती म्हणाली, "बेटा, मी तुझा इतका द्वेष केला, तरी तू माझी एवढी सेवा का केलीस?" पैगंबरसाहेब म्हणाले, "काय करु माई, मला तर सर्वांमध्येच हा खुदा दिसतोय. सारे माझ्या अल्लाचे बंदे आहेत. म्हणून कुणीही मला परका नाही. सारे माझेच आहेत."

संतांचं हृदय हे परोपकाराच्या भावनेने ओथंबून वाहत असतं. हीच शिकवण सांप्रत युगात देताना सद्गुरु बाबाजींनी आपल्याला देखील हाच नारा दिला आहे - नर सेवा नारायण पूजा!

- राजेंद्र थोरात..

## आधुनिक भारताचे जनक

# राजा राममोहन रॉय



भारतभूमीतील अनेक युगपुरुषांनी आपल्या श्रेष्ठतम, नि:स्वार्थी कार्याद्वारे देशाचे नाव विश्वपटलावर विराजमान केले. राजा राममोहन रॉय एक असे व्यक्तिमत्व ज्या व्यक्तिमत्त्वाने भारतीय संस्कृतीची विश्वाला आगळीवेगळी ओळख करुन दिली. धर्म, शिक्षण, अर्थशास्त्र, वृत्तपत्र, राजकारण, आंतरराष्ट्रीय संबंध अशा अनेक क्षेत्रांमध्ये सुबोध व परिपूर्ण विचारांद्वारे त्यांनी आपली मते मांडली. अठराव्या शतकाचा उत्तरार्ध व एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात अंधश्रध्देच्या विचारात गुरफटलेल्या भारतीय समाजाला नवविचारांची दृष्टी दिली. हिंदू-मुस्लिम, ख्रिश्चन आदी धर्मांचा सखोल अभ्यास करुन एकेश्वराची संकल्पना मांडली. विश्वाचा निर्माता एकच आहे. सर्व मनुष्यप्राणी त्याची लेकरे आहेत. तो निराकार आहे, असे क्रांतिकारी विचार त्यांनी मांडले. राजा राममोहन रॉय यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी सती प्रथा बंद करण्यासाठी घेतलेली अविश्रांत मेहनत, सती प्रथेच्या निर्मुलनासाठी ते इंग्लंडला गेले. लॉर्ड विल्यम बेटिंकच्या सहाय्याने त्यांनी ही पध्दत बंद केली. वृत्तपत्र स्वातंत्र्य तसेच शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

बंगाली, उर्दू, पर्शियन, लॅटिन, ग्रीक, हिब्रू, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, अरबी अशा दहा भाषा त्यांना अवगत होत्या. अफाट बुध्दिकौशल्यामुळे दिल्लीच्या दुसऱ्या अकबर बादशहाने त्यांना 'राजा' ही सन्मानाची पदवी दिली. विश्वबंधुत्वाच्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. पौर्वात्य संस्कृती व पाश्चिमात्य संस्कृतीचा सुवर्णमध्य साधण्यात ते यशस्वी झाले. २२ मे त्यांचा जन्मदिन. त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या कार्यास कोटी-कोटी प्रणाम!



पौराणिक कथा

# रावण व यमदेव युद्ध

पुष्पक विमानातून यात्रा करीत असताना रावणाला ढगामध्ये नारद मुनी भेटले. तेव्हा नारद म्हणाले, "रावणा, तू मृत्यूलोकीच्या प्राण्यांचा वध का बरे करीत आहेस? मुळात ही मृत्यूलोकातील माणसे दारिद्र्य, वार्धक्य, शेकडो रोगराई यांनी पीडित असतात. देवानं व नियतीनं मारलेल्या या लोकांना आणखी मारण्यात काय अर्थ आहे? या मृत्यूलोकावर खरी सत्ता कोणाची असेल तर ती यमदेवाची. कारण यम हा मृत्यूचा देव आहे आणि मृत्यूपुढे कुणाची काही मात्रा चालत नाही."

"हे अजिंक्य योध्द्या, तू साक्षात यमालाच आपल्या काबूखाली आण ना! एकदा यमाला जिंकले तर सर्वांनाच जिंकल्यासारखे होईल!"

यावर विकट हास्य करीत रावण फुशारकीने म्हणाला, "देवर्षी, मी तुमच्या म्हणण्याचा स्वीकार केला आहे. जगातल्या प्राण्यांना मृत्यूचे कष्ट देणाऱ्या यमालाच मी आता मृत्यूच्या स्वाधीन करीन."

नारद रावणाच्या आक्रमणाची वार्ता सांगण्यासाठी यमलोकी गेले. तेथे जाऊन त्यांनी पाहिले, की यमदेव अग्नीला साक्षी ठेवून समोर बसले आहेत आणि कर्म तसे फल या न्यायाने प्राण्यांची व्यवस्था लावत आहेत. यमदेवाचे लक्ष जाताच, नारदमुनींचे स्वागत करीत त्यांच्या आगमनाचे कारण त्यांनी विचारले. त्यावर

नारदमुनी उत्तरले, “पितृराज, ऐक. दशग्रीव, रावण नावाचा एक उन्मत्त निशाचर तुझ्यावर मात करण्यासाठी इकडे येऊ पाहत आहे. तुला या संकटाची सूचना देण्यासाठी मी इकडे आलो. अर्थात कालदंडरुपी आयुध धारण करणाऱ्या तुझ्यासारख्याची तो राक्षस काय हानी करु शकणार आहे म्हणा!” तेवढ्यात रावणाच्या पुष्पक विमानाचे यमलोकात आगमन झाले. रावणाने पाहिले, खूपसे प्राणी आपल्या पाप-पुण्याचे फळ भोगीत आहेत. यमराजाच्या सेवकासह त्याचे सैनिकही दशग्रीवाने पाहिले. यमदूत कितीतरी प्राण्यांना पीडा देत होते. कित्येक किडे खात होते. कित्येकांना कुत्री बोचकारीत होती. ते भयानक चित्कार करीत होते. कोणाला रक्ताने भरलेली नदी पार करावी लागत होती. कोणी तापलेल्या वाळूवर, कोणी सुऱ्या-तलवारीच्या धारेवरुन पळत होते. कोणी खाऱ्या पाण्याच्या नदीत बुचकळले जात होते. कोण भूक व तहानेने तडफडत होता. कोणी अंगाला मैला चिखल फासलेल्या दयनीय अवस्थेत होता. अशाप्रकारे आपापल्या पापाप्रमाणे मर्त्य जीव यमयातना भोगत होते.

दुसरीकडे पुण्यात्मे उत्तम घरात राहून संगीत-वाद्यांच्या मनोहर ध्वनीत रममाण होत होते. कोणी पुण्यात्मे सुंदर स्त्रियांच्या सहवासात रममाण होते. राक्षसाने आपल्या बळाच्या जोरावर पापी आत्म्यांना यमयातनेतून मुक्त केले. त्यामुळे यमदूत क्रोधीत होऊन राक्षसराज रावणावर तुटून पडले.

फुलावर भुंग्यांचे थवे येऊन बसावेत तसे अगणित यमदूत रावणाच्या पुष्पक विमानावर चढले. त्यांनी विमानाची मोडतोड व विध्वंस चालविला, परंतु ब्रह्मदेवाच्या वरदानामुळे पुष्पक विमान पुन्हा पूर्ववत होत होते. मग यमदूत व रावणाची सेना यात तुंबळ युध्द सुरु झाले. तो रक्तरंजित संग्राम होता. रावणदेखील रक्तात न्हाला. रावणाचे कवच तुटले. मग रावणाने पाशुपतास्त्र सोडून यमदूतांची दैना उडवली व विजयनाद करावयास सुरुवात केली. आपल्या यमपक्षाचा झालेला हा विनाश पाहून यमाचे डोळे लाल होऊन गरागरा वाटोळे फिरु लागले. यमदेव रथात आरुढ होऊन रावणाच्या रथापाशी पोहोचले. शक्ति व तोमरांचा प्रहार त्यांनी रावणावर केला. रावणानेही प्रचंड बाणवर्षावाने यमाला त्रस्त, पीडित व घायाळ केले. तसे रावणाला संपविण्यासाठी यमदेवाने शेवटचे हत्यार म्हणजे कालदंड याचा वापर करण्याचे ठरविले. यमाने कालदंड उचलला, परंतु ब्रह्मदेवाने त्याला रोखले व म्हटले, “यमराज, तू रावणावर कालदंडाचा वापर करु नकोस. कारण रावण अजिंक्य आहे व ते वरदान मीच त्याला दिले आहे. दुसरीकडे कालदंड प्रभावी ठरले तर मी दिलेले वरदान निष्प्रभ ठरणार आहे. म्हणजे कालदंडाने रावण मेला किंवा मेला नाही, तरी दोन्हीकडून माझ्या वरदानाची दुष्कीर्ती होणार आहे!”

यमाने मग विचारपूर्वक कालदंड मागे घेतला. आपले हे युध्द निरर्थक आहे, हे लक्षात येताच यमदेव रथासह अंतर्धान पावले. आपण यमावर मात केली, त्याला रणातून पळवून लावले, अशा विजयोन्मादात रावण यमलोक सोडून निघून गेला.

❍ **क्रमशः**



कथा

# खरे मित्र

एका तळ्याकाठी माकडं, ससे, हरणं, खारी, हत्ती असे खूप प्राणी राहत होते. सगळेजण आपापल्या नादात असायचे. कोणी कोणाशी बोलायचं नाही, की एकमेकांशी खेळायचे नाहीत. त्यातल्या एका छोट्या सशाशी मात्र सगळेजण गप्पा मारायचे. त्यामुळे सशाला वाटायचं, की तो तर सगळ्यांचा लाडका आहे. सगळेच त्याचे जवळचे मित्र आहेत. ससा त्यावरुन खूप बढाया मारायचा.

एके दिवशी खेळता खेळता सशाच्या पायाला दगड लागला आणि त्यातून रक्त येऊ लागलं. पाय दुखू लागला. खूप भूक लागली असूनही दुखऱ्या पायामुळे त्याला तळ्याकाठची पानं खायला जाता येत नव्हतं. तेवढ्यात त्याला माकड दिसलं. माकड आणि ससा तर रोज टिवल्याबावल्या करुन धम्माल करायचे. ससा

त्याला म्हणाला, “ए माकडदादा, माझा पाय खूप दुखतो आहे आणि मला भूकही लागली आहे. मला जरा त्या झाडावरची फळं काढून देतोस का ?”

माकड म्हणालं, “दिली असती रे; पण मला आत्ता खूप महत्त्वाचं काम आहे. तिकडे जायचं आहे.”

झाडावरची खार ते ऐकत होती. तिनं पटकन झाडाची थोडी कोवळी पानं तोडली आणि सशाला नेऊन दिली. त्याची विचारपूस केली आणि लवकर बरा हो, असं सांगून ती पुढे गेली. सशानं खारीचे आभार मानले. त्याला पानं खाल्ल्यावर जरा बरं वाटलं. तेवढ्यात त्याला काही शिकारी त्याच्या दिशेने येताना दिसले. तितक्यात त्याला हरीण दिसलं. हरीण आणि तो अनेकदा पळण्याची शर्यत लावत असत. त्यामुळे सशाला वाटलं, आता या शिकाऱ्यांपासून हरीणच आपलं रक्षण करेल. त्यानं हरणाला विचारलं, “माझा पाय दुखतो आहे. त्यामुळे मला पळता येत नाही. तू मला तुझ्या पाठीवर बसवून लांब घेऊन चल आणि त्या शिकाऱ्यांपासून वाचव.”

हरीण म्हणाले, “नेलं असतं रे; पण मला आता त्या तळ्यापलीकडच्या मित्रांना भेटायला जायचं आहे. शिवाय मलाही शिकाऱ्यांची भीती वाटते. मी पळतो.” हरीण पळून गेलं. इकडे शिकारी जवळ येऊ लागले, तसा ससा खूप घाबरला. त्याला कळून चुकलं, की तो आता त्यांच्या जाळ्यात सापडणार. त्याचा पाय खूप दुखत होता. पळताही येत नव्हतं. तो तसाच पाय खुरडत खुरडत लपायला जागा शोधू लागला.

तेवढ्यात कोणीतरी विचारलं, “असा का चालतो आहेस ? पायाला लागलं आहे का ?”

सशानं वर बघितलं, तर हत्तीचं पिल्लू होतं. सशानं त्याला शिकाऱ्यांबद्दल सांगितलं, हत्तीदादाने आपली सोंड पुढे केली. म्हणाला, “चल बस यावर. मी तुला माझ्या घरी घेऊन जातो.”

ससा हत्तीच्या सोंडेवर बसून त्याच्या घरी गेला. हत्तीच्या आईनं त्याच्या पायाला औषध लावलं. त्याला खाऊ-पिऊ घातलं. पाय बरा झाल्यावर सशानं हत्तीच्या पिल्लाचे आणि त्याच्या आईचे खूप खूप आभार मानले. जाताना हत्तीण त्याला म्हणाली, “आपण सर्वांना आवडतो अशा खोट्या भ्रमात राहू नकोस. खरे मित्र कोण आहेत, ते ओळखायला शिक. जे संकटाच्या वेळी मदत करतात, ते आपले खरे मित्र.”

ससा म्हणाला, “मी हे सगळं लक्षात ठेवीन. त्यानं परत एकदा हत्तीचे आभार मानले आणि तो उड्या मारत आपल्या घरी परतला.”

❑❑❑

## सुख


*ज्याला आपण सुख समजतो, ते नेहमी आपल्या मनामध्ये दुसऱ्या सुखाची अभिलाषा निर्माण करुन लोप पावते, एवढेच नव्हे तर ते त्रासाचेदेखील कारण बनते. म्हणूनच संतांनी सांसारिक सुखांना स्वप्नांची उपमा दिली आहे.*

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# शब्दकोडे

# १६६

विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)



## आडवे शब्द

१. राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन मे महिन्याच्या ...... तारखेला साजरा करतात.
४. रावणाचा भाऊ......याने ब्रह्मदेवाकडे वर मागताना इंद्रपद म्हणण्याऐवजी निद्रापद हा शब्द उच्चारला व म्हणून तो दीर्घकाळ निद्राधीन असे.
५. बांगलादेशाचे चलन
६. दुधाने तोंड पोळले की माणूस ....... ही फुंकून पितो (म्हण)
७. सीता स्वयंवराच्या वेळी प्रभू रामचंद्रांनी शिवधनुष्य मोडल्यावर क्रोधीत झालेले ऋषी
८. मगर, एक रास
१०. गाडगे महाराजांचा जन्म ........ जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला.
१२. नाव मोठे ....... खोटे (म्हण)
१३. दुर्योधनाच्या मातेचे नाव

## उभे शब्द

१. कोणत्या मुघल सम्राटाच्या काळात बीरबल होऊन गेले.
२. कुंतीला विवाहापूर्वी सूर्यापासून प्राप्त झालेला पुत्र
३. रावणाची नगरी
४. ज्येष्ठ पांडव युधिष्ठिरच्या मातेचे नाव
५. रायगडावरील एक कडा, बाळाचे पाहणे
६. राजा हरिश्चंद्राची पत्नी
७. सूर्य मावळतो ती दिशा
९. प्रसिध्द पर्यटनस्थळ गणपतीपुळे महाराष्ट्राच्या कोणत्या जिल्ह्यात आहे?
१०. आत्माराम रावजी देशपांडे हे साहित्यिक कोणत्या टोपण नावाने कविता लिहित? (अनिल/कपिल)
११. भगवान शंकरांनी दशाननाचे नाव ......... असे ठेवले.

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : देव आहे की नाही ?**

**उत्तर :** या प्रश्नाचं उत्तर होय किंवा नाही असं दिलं तर त्यातून पुन्हा प्रश्न उपस्थित होणार. यासाठी एकच उदाहरण पाहूया. दोन मासे एका महासागरात आहेत. एक मासा म्हणतो, चल आपण पाणी शोधायला जाऊ. दुसरा म्हणतो, वेडा आहेस तू! पाणी नावाची अशी कुठलीच वस्तू नाहीये. कशाला व्यर्थ फिरतोस ?

त्या दोघांचं संभाषण जर आपण लक्षात घेतलं तर आपण सहज म्हणू, की अरे वेड्यांनो! पाण्याशिवाय तुमच्या आजूबाजूस तर काहीच नाही. ज्यामध्ये तुम्ही राहता, खाता, जन्म घेता, मरण पावता तीच वस्तू पाणी आहे. पाण्याशिवाय तुमचं अस्तित्वच राहणार नाही. अगदी हेच उत्तर संत-महापुरुष 'देव आहे का ?' या प्रश्नावर वाद घालणाऱ्यांना देतात. अर्थात हा प्रश्न तोच विचारु शकतो, ज्याला देवाची, ईश्वराची, अल्लाची, गॉडची या सुप्रीम एनर्जीची ओळख नाही.

**प्रश्न : ब्रह्मज्ञानी संत-महात्म्याने देह त्यागल्यानंतर काही वेळा कुटुंबातील सदस्य त्यांचा अंत्यविधी पारंपारिक पध्दतीने कर्मकांडाने करतात. हे योग्य आहे का ? त्यामुळे त्यांच्या मोक्ष-मुक्तीत अडथळा येत नाही का ?**

**उत्तर :** 'ब्रह्मज्ञानी का सकल आकार। ब्रह्मज्ञानी आप निरंकार।' या गुरु नानकदेवांच्या वचनाप्रमाणे ब्रह्मज्ञानी संत-महात्मा जीवंतपणीच मुक्त असतो. तो कुठल्याही बंधनात नसतो. मुक्तीचा अंत्यविधीच्या पध्दतीशी काहीही संबंध नाही. कुटुंबीय जर ज्ञानी नसेल तर भीतीपोटी ते असे विधी करतात. हा ज्याच्या त्याच्या भावनेचा प्रश्न आहे. परंतु ज्ञानी भक्त भ्रमातून मुक्त झाल्यामुळे ते कुठलेही कर्मकांड करत नसतात.

**प्रश्न : घरातून सत्संगाला जायला विरोध होत असेल तर काय करावे ?**

**उत्तर :** वास्तविक सत्संग जीवनाचं अविभाज्य अंग आहे. सत्संग हा रिवाज नाही तर स्वभाव बनावा; परंतु बऱ्याचदा घरातून या गोष्टीला विरोधही होतो. विशेषतः भगिनींना याची झळ सोसावी लागते. अशावेळी खूप धैर्याने, सामंजस्याने घ्यावे. विनाकारण घरात भांडण-तंटे करु नये. आपल्या वर्तनाने व आचरणाने सर्वांची मनं जिंकावीत. जेवढा वेळ मिळेल, जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तेव्हा जरुर सत्संग करावा. नामस्मरण करावे. यथाशक्ती सेवा करावी. विरोध करणारे आपल्या नम्र व सहनशील स्वभावानेच बदलू शकतात.

❑❑❑



# सद्गुरु वचनामृत

## निर्मळ मन

आपण कधी कटुता आणि गोडवा यांचा उल्लेख करतो तेव्हा म्हणतो, की याच्या जिभेत जो गोडवा आहे तो खडीसाखरेप्रमाणे आहे. कटुतेचा उल्लेख होतो तेव्हा म्हणतो, की याची जीभ किती कडू आहे. कटुता किंवा गोडवा मनुष्याच्या मनात असतो तो जीभेच्या माध्यमातून बाहेर येतो. मनात कटुता असेल तर कटूताच बाहेर येईल. ज्याप्रमाणे आपण पाहतो, की पाणी उताराच्या दिशेने जाते त्याप्रमाणे जे आत असते तेच बाहेर येते. काहीवेळा मानवाच्या बाबतीत असेच होते. मानवी स्वभाव असा आहे, की निरर्थक गोष्टी, निंदा, चुगली, ईर्ष्या याकडे जास्त लक्ष दिले जाते. म्हणूनच म्हटले जाते, मन जीते जग

जीते. ज्याने आपल्या मनावर नियंत्रण केले त्याने जगावर नियंत्रण केले. कारण मनावर नियंत्रण केल्यावर सकारात्मक भाव राहतो. मग आपण कधीही दुसऱ्याचे वाईट चिंतणार नाही आणि करणारही नाही. तसेच स्वत:चेही नुकसान करणार नाही आणि दुसऱ्याचेही नुकसान करणार नाही.

बाबाजींनी अजून एक सोपा उपाय सांगितला आहे, की या निराकार प्रभु-परमात्म्याशी, स्मरणाशी, सत्संगाशी जोडून राहावे. निरंकाराशी जोडून राहिलात तर आपल्यामध्ये इतरांच्या हिताची भावना येईल, सर्वजण आपलेच वाटतील. लहान-मोठा, काळा-गोरा, जाती-पातीचा भेदभाव मिटून जाईल कारण सर्वात निराकाराचे रुप दिसेल. निराकारात जेव्हा सर्वांचे रुप दिसेल तेव्हा इतरांच्या हिताची भावना सर्वांमध्ये जागी होईल.

आपण बघतो, की मिशनमधील मुलं नेहमी प्रत्येक ठिकाणी सेवेसाठी तयार असतात. फक्त मिशनमध्येच नाही तर बाहेरही आदेश मिळतो तेव्हाही सेवेसाठी तत्पर असतात. भक्त कधीच सेवेचा अभिमान करत नाहीत कारण ते जाणतात, की हा जो निराकार आहे तोच आमच्याकडून सेवा करुन घेतो आहे आणि तोच कर्ता आहे आणि करणाराही तोच आहे. आपण स्मरणाशी जोडून राहिलो तर प्रत्येक क्षणी प्रभु-परमात्म्याचे ध्यान राहील. कोणत्याही निरर्थक गोष्टींकडे आपण जात नाही. आपसात मिळून-मिसळून सत्संग करु, महापुरुषांचं दर्शन होईल. जेव्हा प्रभुची चर्चा करु तेव्हा अनेक लोकांच्या कानापर्यंत परमात्म्याचा आवाज पोहचेल आणि तेही मिशनशी जोडले जातील.

शहनशाहजींनी एकदा सांगितले होते, की आपण जिथे बसू तिथे प्रभू परमात्म्याचीच चर्चा करा. कोणाची कधीही निंदा करु नका. त्याच्याबद्दल चुकीची चर्चा करु नका. आपण प्रभुची चर्चा केली तर आपल्या मनात आणि मुखात सदैव गोड शब्द राहतील. भक्त नेहमी निराकार प्रभुच्या चरणी हीच प्रार्थना करतात, की मी आपल्या मिशनचे नाव उज्ज्वल करीन, ज्ञानाचा प्रकाश जागोजागी पसरवीन. कारण ज्याप्रकारे माझ्या जीवनात आनंद आला आहे, सुख आले आहे, तोच आनंद आणि सुख जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचवीन. कारण सर्वांचे जीवन आनंदाने व्यतीत होईल. ❑❑❑

# सत्य

ज्याप्रमाणे एखाद्या ठिकाणी प्रकाश हवा असेल तर तिथे फक्त उजेड करावा लागतो. अंधाराचा विरोध किंवा खंडण करावे लागत नाही. त्याचप्रमाणे सत्याच्या प्रचारासाठी केवळ सत्य प्रगट करावे लागते. असत्याच्या विरोधात लढण्याची गरजच उरत नाही.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**



कथा

# शहाणी चिऊताई

एक होता कावळा आणि एक होती चिमणी.... फसलात ना? पण थांबा. नेहमीची गोष्ट नाही हं. हा तर दुसराच कावळा आणि चिमणीही दुसरीच. या दोघांनाही राहायला घर नव्हतं. मग दोघांनी विचार केला आपणच आपलं घर बांधावं. दोघंही जागा शोधू लागले. रस्त्याच्या कडेला एक मोठ्ठं झाड दिसलं. झाड खूप उंच होते. कावळ्याला ही जागा पसंत पडली. चिऊताईला मात्र प्रश्न पडला, एवढ्या उंच जागी कसं बांधू माझं घरटं? म्हणून ती जवळच दुसरी जागा शोधू लागली. झाडाच्या थोडं पाठीमागे एक रिकामं कौलारु घर होतं. चिमणीनं त्या घराच्या वळचणीला म्हणजे खिडकीवरच्या मोकळ्या फटीत घरटं बांधायचं ठरवलं. कावळा हसून म्हणाला, ए वेडे, मी बघ किती उंच-उंच घर बांधणार आहे आणि तू? कावळ्यानं तिला खूप-खूप चिडवलं, तिची चेष्टा केली. चिमणी बिचारी हिरमुसली पण तिनं

विचार बदलला नाही. घरटं बांधायला सुरुवात झाली. चिमणी चोचीतून एकेक काडी घेऊन येत असे. ती ठेवून दुसरी आणण्यासाठी जात असे. कावळा मात्र लबाड! चिमणी काडी ठेवून गेली, की तो पटकन ती उचलून आपल्या घरट्यात आणून टाकत असे. त्यामुळे झाले काय की कावळ्याचे घरटे लवकर पूर्ण झाले. कावळ्याने तिला खूप चिडवले, मंद, किती हळूबाई आहेस गं. एवढंसं लहान घर बांधायला इतका वेळ? कावळा मोठ्या गर्वाने बोलत होता. चिमणीला दु:ख झालं.

एके दिवशी चिमणी घरट्यात झोपली होती. ठकठक अशा कसल्यातरी आवाजानं चिमणी जागी झाली. तिने पाहिलं तर काय. कावळ्याने ज्यावर घरटे बांधले होते ते झाड, चार-पाच लोक कुऱ्हाडीने तोडत होते. चिमणीला वाईट वाटलं. पडलेलं घर पाहून कावळा दु:खी झाला. त्याच्या डोळ्यांतून घळघळा पाणी येऊ लागले. चिमणी त्याच्याजवळ येऊन म्हणाली, "कावळेदादा रडू नकोस. मी तुझ्याइतकी चपळ, हुशार नाही. तुझ्यासारखं माझं घर मोठ्ठं नाही; पण तुझं दुसरं घर तयार होईपर्यंत माझ्या लहानशा घरात तू राहू शकतोस." कावळा मनात खजिल झाला.

आपण या चिमणीला इतका त्रास दिला, पण संकटात ती आपल्याला मदत करत आहे. मी दुष्टपणाने वागलो म्हणून मला शिक्षा मिळाली. असं त्याला वाटलं. तेव्हापासून कावळा सगळ्यांशी चांगला वागू लागला.


❐❐❐

# भारतीय क्रिकेटची सुरुवात

भारतात क्रिकेटची सुरुवात होऊन सव्वादोनशे वर्षे होऊन गेली आहेत. १७९० साली ब्रिटीश सेना व ईस्ट इंडिया कंपनी दरम्यान कित्येक क्रिकेट मॅच खेळल्या गेल्या. परंतु अस्सल भारतीय क्रिकेट टी म्हणून 'पारशांचा क्लब' सन १८८६ मध्ये प्रसिध्दीस आला. त्याच वर्षी पारशांची टीम इंग्लंडला क्रिकेट खेळायला गेली. त्याचे कप्तान होते, डॉ. डी.एच.पटेल. या संघात एकूण १५ खेळाडू होते. त्यातील १२ खेळाडू मुंबईचे व ३ खेळाडू कराचीचे होते. १७ एप्रिल १८८६ रोजी ही टीम इंग्लंडला पोहोचली. या क्लबला इंग्लंडच्या सरे टीमचे खेळाडू रॉबर्ट हॅंडरसन यांनी प्रशिक्षित केले. कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते फिरोजशहा मेहता यांनी या टीमला शुभेच्छा दिल्या होत्या. इंग्लंडमध्ये पारशी क्लबने एकूण २८ सामने खेळले. त्यातील १९ सामन्यात क्लबची हार झाली. ८ सामने ड्रॉ झाले. तर एक सामना पारशी क्लबने जिंकला होता.

एकूण दौऱ्यात पारशी क्लबचा दारुण पराभव झाला असला तरी, भारतीय खेळाडू नाराज झाले नाहीत. ते क्रिकेट खेळाचा अनुभव घेऊन मायदेशी परतले होते. खूप प्रॅक्टीस करुन ते पुन्हा इंग्लंडला गेले व १९ सामने खेळून ८ सामने जिंकले होते. ११ सामने हरले होते. भारतीय खेळाडूंची नंतर टप्प्याटप्प्याने प्रगती होत गेली.

❐❐❐



# आजोबा

चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा







त्यांनी गांधीजींना एक सुंदरसं खेळणं दिलं आणि म्हणाले की, हे आमच्या देशात फार प्रसिध्द आहे. ते खेळणं पाहून गांधीजी फार खूश झाले.
त्यातील एका माकडाने डोळ्यावर हात ठेवला होता. दुसऱ्याने कानावर आणि तिसऱ्याने तोंडावर हात ठेवला होता. हे खेळणे चीन आणि जपान या दोन्ही देशांच्या संस्कृतीशी संबंधीत आहे.
हे खेळणं फारच छान आहे. हे मी कायम माझ्याबरोबर ठेवीन.


त्यानंतर गांधीजी जिथे जात तिथे ते खेळणे आपल्यासोबत घेऊन जात असत. त्या खेळण्यावर त्यांचे विशेष लक्ष असे. त्यांच्याबरोबर जे लोक असत, त्यांना हे सर्व पाहून फार आश्चर्य वाटे.
एके दिवशी बापूजी ते खेळणं समोर ठेवून त्याकडे अतिशय एकाग्रतेने पाहत होते. त्यांच्या एका मित्राने त्यांना विचारले, ‘तुम्ही या साधारणशा खेळण्याकडं असं काय पाहत आहात ? काही विशेष आठवणी जोडल्या आहेत का याच्याबरोबर ?’
गांधीजी म्हणाले, हे साधारणसं खेळणं नाहीये. ही तिन्ही माकडं आपल्याला वेगवेगळी शिकवण देत आहेत. हे डोळ्यावर हात ठेवलेलं माकड आपल्याला सांगत आहे की, वाईट गोष्टी पाहू नका. ह्याचे नाव मिजारु आहे.


दुसरं जे माकड आहे, ज्याने आपले कान बंद केले आहेत. ते आपल्याला शिकवतं की, वाईट ऐकू नका. याचं नाव आहे किकाजारु.
हे तिसरं जे माकड आहे जे तोंडावर हात ठेऊन आहे ते आपल्याला कधीही वाईट बोलू नका अशी शिकवण देतं. त्याचं नाव आहे इवाजारु.
गांधीजी म्हणाले, कधीही वाईट बोलू नका, वाईट पाहू नका आणि कधीही वाईट ऐकू नका हीच शिकवण मला घरोघरी पोहचवायची आहे; जेणेकरुन समाजातील सर्व लोक वाईट वृत्तींपासून वाचतील.
हो ! तेव्हाच सर्व लोक म्हणतात ना, गांधीजींची तीन माकडं.
हो, मुलांनो ! आपणसुध्दा जर या तीन गोष्टी जीवनात आणल्या तर वाईट गोष्टींपासून दूर राहून एक चांगली व्यक्ती बनू शकतो.



# जन्मांध अभिधा घुमटकर यांची उच्चशिक्षण भरारी

साठ्ये कॉलेजच्या इतिहास विभागप्रमुख असलेल्या डॉ. अभिधा घुमटकर यांचा प्रवास खरोखरच थक्क करणार आहे. सामान्यांच्याही जिद्दीच्या आणि इच्छेच्या कवेत न येणाऱ्या गोष्टी डॉ. घुमटकर यांनी मिळवल्या आहेत. अभिधा म्हणजे अर्थ धारण करणारी पहिली शक्ती. त्यांनी आपल्या आयुष्याला इच्छाशक्तीच्या बळावर नवा अर्थ दिला आहे.

डॉ. अभिधा जन्मांध आहेत. मात्र त्यांच्या आईने त्यांना सर्वसाधारण मुलांच्या शाळेत पाठवण्याचा निर्णय घेतला. ७०च्या दशकात हे काम सोपे नव्हते. अनेक शाळांनी त्यांना प्रवेश नाकारला. एका शाळेत तर त्यांची रंग ओळखण्याची परीक्षा घेऊन त्यांना नाकारण्यात आले. मात्र त्यांच्या आईने हार मानली नाही. बोरिवलीच्या सुविद्यालयामध्ये त्यांना प्रवेश मिळाला. या शाळेत सुरुवातीला अडचणी आल्या. अंध व्यक्ती कधीच इथे त्यापूर्वी शिकली नसल्याने अभिधा यांना नेमके शिकवायचे कसे हे शिक्षकांना कळत नव्हते. तिथे त्या रुळत होत्या, तोच त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि त्या विलेपार्ले इथे आल्या. प्रार्थना समाज शाळेमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अभिधा यांची धाकटी बहीणही जन्मांध आहे. हा त्यांच्या कुटुंबियांसाठी मोठा धक्का होता. मात्र ही परिस्थिती स्वीकारुन त्यांच्या आईने मार्ग काढला. नोकरी करुन, घर सांभाळून त्यांच्या आईने मुलींना शिकवले. त्या धडे वाचून दाखवायच्या. ते धडे रेकॉर्ड करायच्या. अभिधा यांना पीएचडी करतानाही त्यांच्या आईने त्यांना कायम मदत केली आहे. अभिधा यांच्या अंगी ही जिद्द असल्यानेच हा प्रवास शक्य झाला.

अभिधा यांनी साठ्ये कॉलेजातून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एमए, पीएचडी, एमफिल आणि आता तर त्या पीएचडीसाठी गाइड म्हणूनही मार्गदर्शन करु शकतात. त्यांनी बीएडसुध्दा केले. मात्र बीएडला प्रवेश घेतानाही त्यांना अंध असल्याने तुम्हाला प्रवेश देऊन जागा काय वाया घालवू? अशा प्रश्नांचा सामना करावा लागला.

नोकरी शोधतानाही हाच प्रश्न कायम होता. मात्र त्यांनी एका खाजगी क्लासमध्ये फ्रेंच शिकवले आणि त्यानंतर २००७ साली अपंगांना नोकरीमध्ये देण्यात आलेल्या आरक्षणाच्या बळावर साठ्ये कॉलेजात नोकरी मिळाली.

सन २०१४ मध्ये अभिधा इतिहास विभागाच्या प्रमुख झाल्या. त्यानंतर त्यांनी कॉलेजात विविध अभ्यासक्रमही सुरु केले. त्यांना देवनागरी, रोमन, अरेबिक, बंगाली या चार लिपी येतात. संस्कृत, सिंधी, बंगाली, उर्दू, इटालियन, पर्शियन, जर्मन, फ्रेंच, अरेबिक या भाषांवर त्यांचे प्रभुत्व आहे.

अभिधा यांना गेल्या वर्षी संशोधनासाठी चार्ल्स वॉलेस इंडिया ट्रस्ट फेलोशिप मिळाली. ही फेलोशिप मिळवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय अंध महिला ठरल्या आहेत. त्यांच्या या प्रवासात अनेक अडचणी आल्या मात्र आई, बहीण, मित्रमंडळी, पार्लेकर आणि समाजातील अनेक ओळखीच्या लोकांच्या मदतीने त्यांनी हा देशातील आणि परदेशातीलही शिक्षणप्रवास केला आहे.

## परमवीरचक्र विजेते

# सुभेदार मेजर योगेंद्रसिंह




कारगिलमध्ये टायगरहिल... मोक्याच्या जागेवर अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज पाकिस्तानी सैन्य. उणे तापमान.... अंग गोठवणारी थंडी.. ऑक्सिजनची कमतरता असतानाही रात्री दोन वाजता सुरु केलेली चढाई. दोन रात्रींच्या चढाईनंतर काहीशा सपाट भूभागावर येताच पाकिस्तानकडून झालेला गोळीबार. त्याला प्रत्युत्तर देताना डोळ्यादेखत गमावलेले सर्व साथीदार आणि त्यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी स्वतःच्या अंगावर १७ गोळ्या झेलून शेवटी मृत्यूवरही केली मात.

कारगिल युध्दातल्या निर्णायक अशा टायगर हिलवर पुन्हा ताबा मिळवताना भारतीय लष्कराच्या एका शिपायाची (ग्रेनेडिअर) ही शौर्यगाथा त्याच्याच शब्दात उलगडत गेली आणि पुण्यातील अण्णाभाऊ साठे प्रेक्षागृहात उपस्थितांनी उभे राहून त्यांना कडक सॅल्यूट करत अभिवादन केले.

वडील आणि मोठ्या भावाकडून लष्करात दाखल होण्याची प्रेरणा मिळालेले योगेंद्रसिंह वयाच्या साडेसोळाव्या वर्षीच १८ ग्रेनेडिअर्स या तुकडीत दाखल झाले. दरम्यान ५ मे १९९९ रोजी त्यांचे लग्न झाले आणि २० मे रोजी ते जम्मूमध्ये त्यांच्या तुकडीत सामील झाले. त्यावेळी कारगिल युध्दाला तोंड फुटले होते. त्यांची तुकडी तातडीने द्रासला पाठविण्यात आली. मधल्या काळात लष्कराच्या घातक तुकडीतील काही जवान हुतात्मा झाल्याने योगेंद्रसिंह यांची शारीरिक क्षमता आणि कौशल्य पाहून त्यांची घातक तुकडीत निवड झाली. त्यानंतर त्यांच्या या घातक तुकडीलाच टायगरहिल ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले.

शत्रूच्या नजरेस पडू नये, यासाठी रात्री दोन वाजता त्यांनी चढाईस सुरुवात केली. दिवसा दगडाआड लपून राहिले. दोघांमध्ये अवघा अर्धा बिस्किट पुडा खाऊन ते चढाई करत होते. दुसऱ्या दिवशी पूर्ण रात्र चढाई केली. सपाट भूभाग आला असे वाटत असतानाच पाकिस्तानने जोरदार गोळीबार सुरु केला. त्यामुळे २१ जणांपैकी केवळ ७ जणच वर पोहचू शकले. त्यानंतर एकत्रित गोळीबार करुन पाकिस्तानची एक चौकी ताब्यात घेतली. त्यातून गोळीबार सुरु केला. पण आता स्वतःकडील शस्त्रसाठा संपत आला होता. त्याचाच फायदा घेत पाकिस्तानने आम्हाला तिन्ही बाजूने घेरुन गोळ्यांचा वर्षाव केला. त्यात मेजर योगेंद्रसिंह यांचे सर्व साथीदार त्यांच्या डोळ्यादेखत हुतात्मा झाले. त्यांना स्वतःलाही १७ गोळ्या लागल्या. मात्र शर्टाच्या खिशात असलेल्या ५ रुपयांच्या नाण्यांमुळे त्यांचा जीव शाबूत राहिला. पाकिस्तानी सैनिक तिथे असेपर्यंत त्यांनी मृत्यूमुखी पडले असल्याचे नाटक केले.

❐❐❐



# किल्ले हडसर

हडसर किल्ल्याचे दुसरे नाव म्हणजे पर्वतगड. सातवाहनकालात या गडाची निर्मिती झाली असून या काळात गडावर मोठ्या प्रमाणावर राबता होता. नाणेघाटाच्या संरक्षणासाठी नगरच्या सरहद्दीवर हा किल्ला बांधला गेला. १६३७ मध्ये शहाजी राजांनी मोगलांशी केलेल्या तहामध्ये हडसर किल्ल्याचा समावेश होता, असा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये आढळतो. यानंतर १८१८ च्या सुमारास ब्रिटिशांनी जुन्नर व आसपासचे किल्ले जिंकले. हडसर किल्ल्याच्या वाटाही ब्रिटिशांनी सुरुंग लावून फोडल्या.

### गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे

हडसर किल्ल्याची प्रवेशद्वारे म्हणजे स्थापत्यशास्त्राचा एक नमुनाच आहे. बोगदेवजा प्रवेशमार्गावरची दरवाजांची दुक्कलं, नळीत खोदलेल्या पायऱ्या आणि गोमुखी रचना असलेली प्रवेशद्वारे पाहणे म्हणजे दुर्गशास्त्रातील एक वेगळेच दुर्गवैशिष्ट्य ठरते. गडावरील मुख्य दरवाजातून वर आल्यावर दोन वाटा फुटतात. यातील एक वाट समोरच्या टेकाडावर जाते, तर दुसरी वाट डावीकडे असणाऱ्या दुसऱ्या प्रवेशद्वारापाशी जाते. दुसऱ्या दरवाजातून वर आल्यावर समोरच पाण्याचे एक टाके आहे. यातील पाणी पिण्यास योग्य आहे. येथेच समोर एक उंचवटा दिसतो. या उंचवट्याच्या दिशेने चालत जाऊन डावीकडे वळल्यास कड्यालगतच शेवटच्या खडकात कोरलेली तीन प्रशस्त कोठारे दिसतात. यांच्या कातळावर गणेशप्रतिमा कोरल्या आहेत. ही कोठारे राहण्यासाठी अयोग्य आहेत. येथूनच उजवीकडे गेल्यावर मोठा तलाव लागतो. येथे महादेवाचे मंदिरही लागते. मंदिराच्या समोरच मोठा नंदी असून मंदिराच्या सभामंडपात सहा कोनाडे आहेत. त्यापैकी एका कोनाड्यात गणेशमूर्ती, गरुडमूर्ती तर एकात हनुमानाची मूर्ती स्थानापन्न आहे. मंदिराच्या समोरच एक भक्कम बुरुज आहे. मंदिराच्या समोरच एक तलाव आहे. पावसाळ्यात तलावात भरपूर पाणी साठते. तळ्याच्या मधोमध एक

पुष्पकरणी सारखे दगडातील घडीव बांधकाम आहे. बुरुजाच्या भिंतीच्या उजवीकडे खाली उतरल्यावर एक बुजलेले टोक दिसते. येथून थोडे पुढे गेल्यावर कातळात खोदलेली प्रशस्त गुहा लागते. मात्र ही गुहा म्हणजे पहारेकऱ्यांची देवडीच होय. मंदिराच्या समोरील टेकडीवरुन माणिकडोह जलाशयाचा परिसर अत्यंत सुरेख दिसतो. समोरच चावंड, नाणेघाट, शिवनेरी, भैरवगड, जीवधन असा निसर्गरम्य परिसर न्याहाळता येतो. येथून परत फिरुन प्रवेशद्वारापाशी यावे आणि परतीच्या वाटेला लागावे.


## गडावर जाण्याच्या वाटा

जुन्नरहून निमगिरी, राजूर किंवा केवाडा यापैकी कोणतीही बस पकडून पाऊण तासात हडसर या गावी पोहचता येते. हडसर या गावातून वर डोंगरावर जाताना एक विहीर लागते. येथून थोडे वर गेल्यावर डावीकडे पठारावर चालत जावे. पठारावरील शेतामधून चालत गेल्यावर १५ मिनिटांच्या अंतरावर दोन डोंगरामधील खिंड व त्यामधील तटबंदी दृष्टिक्षेपात येते. खिंड समोर ठेवून चालत गेल्यावर अर्ध्या तासात आपण बुरुजापाशी येऊन पोहचतो. येथून सोपे कातळरोहण करुन आपण किल्ल्याच्या दरवाज्यापाशी येऊन पोहचतो. वाटेतच डोंगरकपारीत पाण्याची दोन टाकी आढळतात. दुसऱ्या वाटेने म्हणजे या खिंडीकडे न वळता सरळ पुढे चालत जाऊन डाव्या बाजूस असणाऱ्या डोंगराला वळसा घालून डोंगराच्या मागील बाजूस पोहचावे. येथून शंभर ते दीडशे पायऱ्या चढून गेल्यावर आपण खिंडीतील मुख्य दरवाज्यापाशी पोहचतो. ही राजदरवाजाची वाट असून अत्यंत सोपी आहे. येथून किल्ल्यावर जाण्यास एक तास पुरतो.


## राहण्याची सोय

महादेवाच्या मंदिरात ४ ते ५ जणांना राहता येते. मात्र पावसाळ्यात मंदिरात पाणी साठत असल्याने राहण्याची थोडी गैरसोयच होते.

❒❒❒


महादेव मंदिर


पाण्याचे तळे


हनुमान मूर्ती



# रोज खात जा : खजूर

प्राचीन काळापासून भारताला खजुराचा उपयोग ज्ञात होता. चरकने श्रमहारक म्हणून खजुराचा उल्लेख केला आहे. भारतात खजुराच्या झाडापासून ताडी-नीरा काढतात. खजुरात ए, बी आणि सी ही तीन जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. ए जीवनसत्त्वामुळे शरीरातील अवयवांचा विकास होतो. बी जीवनसत्त्वामुळे हृदय सशक्त बनते. पचनसंस्था उत्तम बनते. भूक चांगली लागते.

❒ खजुराची चटणी केल्यास जेवणाबरोबर अन्य अन्नपदार्थांसोबत पौष्टिक खजूर खाता येईल. वीस तोळे खजूर घ्या. त्यात अडीच तोळे चिंच कोळून पाणी टाका. एक तोळा द्राक्ष, अर्धा तोळा मिरच्या, अर्धा तोळे आले, दोन तोळे साखर, चवीनुसार मीठ घेऊन चटणी करावी. ही चटणी अत्यंत गुणकारी आणि स्वादिष्ट असते. अन्नपचनासाठी आणि भूक लागण्यासाठी या चटणीचा लाभ होतो.

❒ संधिवात, आमवात, कंबरदुखी असणाऱ्यांनी खजूर आणि त्यासोबत आयुर्वेदातील अन्य गोष्टी मिसळून दररोज दुधाबरोबर घेतल्यास अप्रतिम लाभ होतो.

❒ खजूर, पिंपरी, वेलची, पांढरे चंदन, काकडीच्या बियांचा मगज, धणे, पाषाणभेद, ज्येष्ठ मधाचे सत्त्व, आवळा चूर्ण, शिलाजीत हे सर्व सम प्रमाणात घ्या. एवढीच साखर घ्या. खजूर व शिलाजीत बाजूस काढून बाकी सर्व जिन्नस कुटा. खजूर वेगळा कुटा. त्यानंतर शिलाजीत, खजूर आणि अन्य जिन्नस एकत्र करा. दररोज अर्धा तोळा दुधासोबत सेवन करा.

❒ कंबरदुखीवर आणखी एक उपाय म्हणजे पाच खजूर पाण्यात उकळून त्यात अर्धा तोळा मेथी घालावी. ते पाणी नियमित प्यावे. कंबरदुखी पळून जाते.

❒ आमवातावर खजूराचे पाणी लाभदायक आहे. खजूर पाण्यात कुस्करुन भिजवावा. ते पाणी गाळून प्यावे.

❒ अपघातामुळे किंवा अन्य कारणाने जखमेतून रक्तस्त्राव होऊन बरेच रक्त शरीरातून जाते. शरीराला कंप सुटतो आणि कमालीचा अशक्तपणा वाटतो. अशावेळी १० ते १५ खजूर खावे. त्यावर १ चमचा तूप मिसळलेले गरम दूध प्यावे.

❒ खजूर किंवा खारकाच्या बिया जाळाव्यात. त्यांची जी राख येईल ती कापूर आणि तुपात घालून चांगली पेस्ट तयार करावी. ही पेस्ट दिवसातून तीन वेळा खरुज झालेल्या जागेवर चोळावी, खरुज मुळासकट बरा होतो.

❒ खजुराची चटणी अथवा चाटण जेवणासोबत सेवन करा. रात्री खजूरपाणी गाळून प्या. त्यामुळे सकाळी शौचास साफ होईल.


❒ दररोज थोडा खजूर खा. वर गरम पाणी प्या. रक्तशुध्दी तर होईलच पण छातीतील कफ देखील बाहेर पडेल. फुफ्फुसे मोकळी होतील. सर्दी, खोकला, दमा हे विकार दूर होतील. शरीरातील मांसपेशीना बळ येईल. प्रकृती झपाट्याने सुधारेल, वजन वाढेल.

❒❒❒

# आसन : कुक्कुटासन

कुक्कुट हा संस्कृत शब्द आहे. त्याचा अर्थ कोंबडा असा होतो. या आसनात शरीराचा आकार कोंबड्यासारखा दिसतो, म्हणून या आसनाला कुक्कुटासन असे म्हणतात.

**कृती :-** प्रथम पद्मासन अवस्थेत बसावे. नंतर दोन्ही हात कोपऱ्यापर्यंत पायाच्या पोटऱ्यात घालावेत, तसेच हातांची बोटे पुढच्या बाजूला राहतील अशाप्रकारे दोन्ही हातांचे पंजे जमिनीवर टेकवावेत. फुफ्फुसात श्वास भरुन घेऊन शरीराला जमिनीपासून अधांतरी करावे व नंतर नेहमीप्रमाणे श्वासोच्छवास चालू ठेवावा. जर पद्मासन अवस्थेत पाय थोडे वर उचलले तर पायांच्या पोटऱ्यामागून सहजगत्या हात घालता येतील. स्थूल मनुष्याला मात्र तसे करणे थोडे कठीण जाईल. सुरुवातीला या आसन अवस्थेचा अवधी १० सेकंद असावा. नंतर वाढवीत एक मिनिटापर्यंत स्थिर राहण्याचा सराव करावा.




**फायदे :**

- उत्थित पद्मासन व लोलासनापासून होणारे सर्व फायदे या आसनापासूनदेखील होतात, तसेच उत्थित पद्मासनाने दूर होणारे विकार या आसनानेही दूर होतात.
- पोटात कृमी असणाऱ्यांसाठी हे आसन अतिशय फायदेशीर आहे.
- या आसनामध्ये हाताला संपूर्णपणे व्यायाम मिळतो; त्यामुळे हातातील तीन मुख्य सांधे- मनगट, कोपर व खांदे सुदृढ बनतात.
- या आसनामुळे शरीरात उत्साह वाढतो आणि मन प्रसन्न राहते.

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



आराध्य




मानस टेंगळे



–



साक्षी गुंडाळे



सुहानी सावर्डेकर




विहान तांबे



रिया इसनकर



कार्तिक वाकचौरे



स्वर्णम शिगवण



प्राची देसाई



आर्यन साईल



अगम मदने



निरंत नागटिळक



वेदांत ढेरे



सुयोग शेलार



विराज यादव



सिरवा केरकर

# आई



आ, ई या अक्षरामध्ये जीवनाचे आहे सार
आईमुळेच सारा भरला हा संसार

आईच मला नसती मग मज कैसी उत्पत्ती
म्हणून आई जगती मजसाठी महान अती

सांभाळुनी वाढविला नऊ मास उदरी मजला
ती जाण असावी मजला किती कष्ट दिले मी तिजला

परि कधीना थकली हार नाही मानिली
बाहेर येता माझ्या तो घास मुखी घातला

होता किती तिच्यातो प्रेमाने भरलेला
आकाश अपुरे आहे इतुकी पदराची छाया

सात समुंदर समावती इतुकी हृदयातील माया
असे हे मातृऋण कधी कोणाला नाही फिटणार

आई, आई, आई तुझे अगणित असे उपकार
आई या अक्षरामध्ये आहे जीवनाचे सार

आईमुळेच सारा आहे हा संसार

कवीता - उदय पांगे (चेंबूर)

# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : सूर्याचा सर्वात जवळचा तारा कोणता ?**

**उत्तर :** सूर्याच्या सर्वात जवळच्या ताऱ्याचे इंग्रजी नाव आहे, अल्फा सेंटॉरी. मराठीत तो मित्र या नावाने ओळखला जातो. मित्रावरुन सूर्याकडे पाहिले तर शर्मिष्ठा व ययाती यांच्या सीमारेषेवर आणि ययातीच्या ईशान्येला तो स्थानापन्न झाल्याचे आढळेल. तेथून वृश्चिक राशीतील ज्येष्ठा ताऱ्याइतका सूर्य तेजस्वी दिसेल. मित्र ताऱ्यापेक्षाही सूर्याला ०.१ प्रकाशवर्षांनी जवळ असलेला आणखी एक अंधूक तारा नरतुरंग तारकासमूहात आहे. नुसत्या डोळ्यांनी तो दिसत नाही. अल्पा सेंटॉरिपेक्षा तो सूर्याला थोडा अधिक जवळ असल्यामुळे त्याला प्रॉक्सिमा सेंटॉरी असे म्हणतात. प्रॉक्सिमा सेंटॉरी रक्तवर्णी खुजा तारा असून, त्याचा व्यास फक्त ६४००० किलोमीटर आहे. म्हणजे सूर्याच्या तुलनेत तो अगदीच क्षुल्लक आहे, असे म्हणावे लागेल. कारण सूर्याच्या व्यासावर प्रॉक्सिमा सेंटॉरीसारखे जवळजवळ २२ तारे एकासमोर एक असे मांडता येतील. प्रॉक्सिमा आणि अल्फा सेंटॉरी यांच्यामधील अंतर ०.१६६ प्रकाशवर्षे असावे. म्हणजे अल्फा सेंटॉरी किंवा मित्र हे ताऱ्यांचे एक त्रिकूट आहे, असे म्हणायला हरकत नाही.

**प्रश्न : चंद्रावरुन पृथ्वी कोठे दिसेल ?**

**उत्तर :** गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे आपण पृथ्वीच्या केंद्राकडे खेचले गेलो आहोत. यामुळे अंतराळात आपले स्थान कसेही असले तरी आपण पृथ्वीला (जमिनीला) आपल्या पायाखाली असल्याचे समजतो. याचप्रकारे आपण चंद्रावर असल्यास, चंद्रावर असलेले कमी प्रमाणातील गुरुत्वाकर्षणही चंद्रावरील जमीन आपल्या पायाखाली असल्याचे समजते (जाणवते) आणि ज्याप्रकारे पृथ्वीवरुन चंद्र पाहताना मान वर करावी लागते. त्याचप्रकारे चंद्रावरुन पृथ्वी पाहताना मान करावी लागते. जरी आपण उलटे असलो तरी पृथ्वी आपल्याला वरच दिसते.

**प्रश्न : कलिंगडला वॉटरमेलन असे का म्हणतात ?**

**उत्तर :** कारण त्यात पाणीच पाणी असते. कलिंगडामध्ये ९० टक्के पाणी असते. कलिंगडामधील काही पेशी स्वत:मध्ये जास्तीत जास्त पाणी साठविण्याची क्षमता राखतात. या पेशींना बब्बळ पेशी म्हणतात. कलिंगड हे उन्हाळ्यातील जमिनीच्या वर येणारे फळ आहे. हे फळ मूळचे आफ्रिकेचे पण आज जगातील अनेक देशांत आढळते. काहीजण हे फळाप्रमाणे खातात तर काहीजण याचे लोणचे करुन खातात. हे फळ जसे गोड असते तशाच त्याच्या बियाही चवदार असतात. त्यांच्या सालीचीही भाजी केली जाते. या फळामुळे शरीरातील पाण्याची कमतरता दूर होते. उन्हाने तापलेल्या त्वचेवर लावल्यास आराम मिळतो व थंडावा मिळतो.

❑❑❑

कविता : सौ. अश्विनी किरण लोखंडे (सांगली)

# आली आली सुट्टी आली

सुट्टी आली सुट्टी आली
मौज करुया चला चला ।। धृ ।।



सारे मिळून खेळूया
पत्ते, कॅरम, सोंगट्या
विटी दांडू आणि लगोरी
जाऊ खेळण्या माळावरी
लवकर लवकर चला चला ।।१।।

मित्र मैत्रिणी भाऊ बहीण
सारे सारे या हो मिळून
खो खो खेळू आणि हु तू तू
पाठशिवणीचा खेळ ही खेळू
वेळ नका दवडू चला ।।२।।





जाऊ चला डोंगरावरी
मारु ताव जांभळावरी
खाऊ करवंदे कैरी
तयारीत सर्वांनी चला ।।३।।

झाडाखाली बसूया सारे
खाऊया थंडगार वारे
गाणी गाऊया सर्वांनी
येऊ सांजेला परतुनी
मदत करु मग आईला ।।४।।



दिव्य वाणी

# स्वत:ही प्रसन्न रहा आणि इतरांनाही प्रसन्न ठेवा



मानवाच्या मनाची अवस्था अशी आहे, की तो एकोप्याने रहायला तयार नाही. मनुष्य संकुचितपणा आणि स्वार्थामध्ये लीप्त आहे. तो अभिमानाने फुगलेला असून जात, धर्म, संस्कृती, भाषा, प्रांत, देश इत्यादिंच्या कुंपणामध्ये जीवन प्रवास करावयाचा आहे. लोक संघर्ष करत जगत आहेत. आपल्याला शांतीपूर्ण रीतीने अस्तीत्वात रहायचे आहे. एकमेकांची कदर करुन स्वत:ला सजवायचे आहे. सुगंध पसरवण्याची गरज आहे. बंगाली असो किंवा उडिया असो, पंजाबी असो, मध्य पूर्वेकडील असो किंवा थेट पूर्वेकडील असो सुगंध पसरवण्याची आणि जगाला सुंदर बनवण्याची गरज आहे. अन्यथा संकुचितपणा, हिंसक प्रवृत्ती, अहंकार, लोभ लालसेच्या रुपात सारे दुर्गंध पसरवत आहेत. दुर्गंधाने वातावरण कोंदट होते तर सुगंधाने सगळीकडे प्रसन्नता पसरते. सहनशीलता, प्रेम, एकोपा आणि एकतेमुळे प्रसन्नता लाभते तर द्वेष आणि प्रलोभनामुळे दुर्गंध पसरतो, ज्यामुळे जगाचा कोंडमारा होत आहे. आपण अशा भावनांनी युक्त व्हायचे आहे ज्यायोगे आम्ही स्वत:ही प्रसन्न राहू आणि इतरांनाही प्रसन्नता देत जाऊ.

# बाबा हरदेवसिंहजींच्या नजरेतला मित्र

एकदा बाबा अवतारसिंहजींनी मुलांना प्रश्न विचारला, की आपला खरा मित्र कोण? ज्यांना ज्यांना विचारले जात होते ते उत्तर देत होते, की खरा मित्र तोच जो आपल्या प्रत्येक कामात मदत करतो. आपल्या प्रत्येक सुख-दु:खात सहभागी होऊन मदत करतो. आपल्या मार्गात येणारे अडथळे दूर करतो. जगासमोर आपल्याला चांगल्या रुपात प्रगट करतो अणि शत्रू कोण? असे विचारल्यावर उत्तर दिले, की शत्रू तो जो आपले नेहमी वाईट चिंततो. जगासमोर नेहमी आपल्याला वाईट रुपात प्रगट करतो. आपल्या मार्गात अडथळे आणतो. आपल्याला दु:ख मिळावे यासाठी प्रयत्नशील असतो.

मग बाबा अवतारसिंहजींनी मुलांमध्येच बसलेल्या तारुणाला म्हणजे बाबा हरदेवसिंहजींना प्रश्न विचारला, तुम्ही सांगा खरा मित्र आणि शत्रूची परिभाषा तुमच्या मते काय आहे? बाबाजी म्हणाले, मित्र तोच असतो जो एका प्रभु-परमात्म्याची ओळख करण्याची प्रेरणा देतो. ब्रह्मज्ञान घेऊन जीवन आत्मिक सुखांनी परिपूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न करतो. सत्संग, सेवा, नामस्मरण करण्याची प्रेरणा देतो. जीवनात कितीही कठीण प्रसंग येवोत, सद्गुरुची वचनं ध्यानी ठेवून जर प्रसंगांना आपण सामोरे गेलो तर सारे बिकट प्रसंग मिटू शकतात. मानवी मूल्ये धारण करुन आपल्या जीवनातून सुगंध पसरवू या असे जो सांगतो तोच खरा मित्र असतो. तसेच निराकार प्रभु-परमात्म्यावरचा विश्वास दृढ करण्यास प्रयत्नशील असतो. दुसऱ्याची प्रशंसा करतो व सकारात्मक गुण पाहतो. आणि शत्रू तोच जो सत्संग, सेवा, नामस्मरणापासून दूर करतो. अमानवी मूल्ये धारण करण्याची शिकवण देतो. निराकार प्रभु-परमात्म्यावरच्या विश्वासात बाधा आणतो. दुसऱ्यांच्या त्रुटी व नकारात्मक गुण सांगून निंदा करण्यास प्रवृत्त करतो.

मित्रांनो, मित्र बनवताना आपणही या गोष्टी लक्षात ठेवू या, की जो स्वत:ला आणि आपल्याला सकारात्मक गुणांनी परिपूर्ण करत असेल. जो सद्गुणांच्या मार्गावर चालण्यासाठी अग्रेसर करत असेल अशाच मुलांशी मैत्री करण्याचा प्रयत्न करावा तसेच आपल्या मित्रांना चांगले वळण लागेल, ते कधीही कोणाला अपशब्द बोलणार नाहीत, दुसऱ्यांचा आदर करतील, शिक्षणात अग्रेसर राहतील, आपले जीवन सद्गुणांनी परिपूर्ण करतील अशीच शिकवण वारंवार देण्याचा प्रयत्न करावा आणि स्वत:ही असेच सकारात्मक मित्र बनावे.

(संदर्भ : विचार प्रवाह भाग -१)

❑❑❑



# हसा मुलांनो हसा



मुंबईकर : तुम्ही उकडत असल्यास काय करता ?
पुणेकर : आम्ही कुलरसमोर बसतो.
मुंबईकर : तरीही उकडत असेल तर काय करता ?
पुणेकर : मग आम्ही कुलर चालू करतो.

बंड्या : डॉक्टर साहेब, आपल्या दातांचं रक्षण कोण करतं ?
डॉक्टर : कोलगेट
बंड्या : ते कसं काय ?
डॉक्टर : ते आपल्या दातांना किडण्यापासून वाचवतं.
बंड्या : (डोके खाजवत) पण किडन्या तर पोटात असतात ना !



शिक्षक : गण्या, तू नेहमी शाळेत टोपी घालून का येतोस ?
गण्या : कारण माझ्या डोक्यात काय चालू आहे हे कुणाला कळू नये यासाठी टोपी घालून येतो.





परीक्षक : काय रे बाळा, पंधरा मिनिटात पेपर देऊन बाहेर निघालास ? पेपर कठीण आहे का ?
मुलगा : त्याचं काय आहे सर, ज्याच्या भरोशावर आलो, तोच उत्तर दाखव म्हणतोय.

सीमा आणि मीना देवळात जातात. देवाला प्रार्थना करतात.
सीमा : हे देवा, माझ्या पतीला धन-दौलत, यश सारं काही दे, माझ्यासाठी काही नको.
मीना : काय गं सीमा, नवऱ्यासाठी सारं काही मागितलं; पण स्वत:साठी काहीच का नाही मागितलं ?
सीमा : अगं, देवाने दिलेलं हे सारं काही नवऱ्याकडून कसं काढून घ्यायचं ते माझं काम.

सुभानराव : काय म्हैपतराव, तुमची मुलगी तर काहीच शिकलेली नाहीये. माझा मुलगा डॉक्टर आहे, बी.डी.एस. झालाय तो!
म्हैपतराव : अवं, माझी बी मुलगी डी.बी.एस. पास आहे.
सुभानराव : म्हणजे ?
म्हैपतराव : धुणं, भांडी, स्वयंपाक!

नवीनच लग्न करुन आलेली बन्याची बायको बन्यासाठी चहात टी बॅग बुडवून चहा घेऊन आली.
बन्याची आई : बन्या, तो चहा पिऊ नकोस. फेकून दे.
बन्या : का ? काय झालं ?
बन्याची आई : आरे तुझ्या बायकोने मंतरलेला ताईत त्यात बुडवला आहे.

एक डॉक्टर पेशंटच्या मागे धावत असतो. तेवढ्यात एका पोलीसाचं लक्ष जातं.
पोलीस : डॉक्टर, त्याच्यामागे का धावताय ?
डॉक्टर : अहो, दरवेळी हा मेंदूचं ऑपरेशन करायला येतो आणि केस कापून झाले की पळून जातो.

यूपीचा छेदीलाल मिस्त्रा अचानक पाय घसरुन खड्ड्यात पडला. बबन्या मालवणकर त्याच्याजवळ गेला.
बबन्या : हयसर काय करतास ?
मिस्त्रा : कछु नाही, इहां गिर गये हम, (हात पुढे करत) खिचो!
बबन्या : मी मालवणचो!
मिस्त्रा : अरे खिचो!
बबन्या : अरे मालवणचो! भैरो आसा काय ? कधीपासून इचारतय खईचो ? खईचो ?

मुलाकडचे : आम्हाला स्थळ पसंत आहे.
मुलीकडचे : पण आमची मुलगी अजून शिकतेय.
मुलाकडचे : मग आमचा मुलगा काय लहान थोडीच आहे, तुमच्या मुलीची पुस्तके फाडायला.

# कल्याणस्वामींची गुरुभक्ती

समर्थ कल्याणस्वामींना नेहमी खाजगी कामकाज सांगतात व त्यांच्यावरच समर्थांची नेहमी मर्जी असते, हे इतर शिष्यांना पाहावेना. ते कल्याणस्वामींचा हेवा करु लागले. एके दिवशी समर्थांची स्वारी सर्व शिष्यमंडळींसह रामघळीत होती. शिष्यांना काहीतरी प्रसंग दाखवून प्रचिती दाखविण्याचे समर्थांच्या मनात आले.

एके दिवशी रात्री मध्येच उठून समर्थांनी विडा मागितला. त्यावेळी कल्याणस्वामी दुसऱ्या घळीत गेले होते. दोनतीन शिष्यांनी पाहिले तर डब्यात पाने शिल्लक नाहीत. आता काय करावे म्हणून सारी मंडळी चिंतीत झाली. आधीच पानांची तजवीज करायची ती कोणी केली नाही. तेव्हा समर्थांना काय उत्तर द्यावे, असे मनात येऊन कोणीच काही बोलेना. समर्थांनी दोनतीन वेळा मोठ्यांदा विचारले, तो कल्याणस्वामींच्या कानी हाक गेली. कल्याणांनी विडा आणतो म्हणून सांगितले आणि जाऊन पाहतात तो बटव्यात एकही पान नाही. आता कसे करावे ? म्हणून ते तडक चाफळला पाने आणण्याकरिता निघाले.

रात्र अंधारी, मध्यरात्रीचा समय हे काहीच मनात न आणता समर्थांना उशीर होऊ नये म्हणून पळतच निघाले. थोडे अंतर गेले नाहीत, तोच मार्गामध्ये एक मोठा सर्प त्यांच्या पायाला डसला. त्याचे विष जालीम असल्याने कल्याणस्वामी लागलीच खाली पडले. तेव्हा "जय जय रघुवीर समर्थ" असा त्यांनी दोनतीन वेळा मोठ्याने जयघोष केला.

ती आरोळी समर्थांच्या कानी गेली. तेव्हा समर्थ म्हणाले, "अरे, कोण कल्याण की काय, कोण हाका मारतोय पाहा !"

पण एवढ्या रात्री काळोखातून बाहेर पडतो कोण ? "तू जा, मी जा" असे एकमेकांत हळूहळू चालले होते. अखेर कोणीच बाहेर जात नाही असे पाहून समर्थ स्वतःच उठले व एक चुडी पेटवायला सांगितली. ती बरोबर घेऊन खडी उतरुन पलीकडे जाऊ लागले, तो वाटेत कल्याणस्वामी पडले आहेत व सर्प फणा काढून बाजूला बसला आहे, असे त्यांनी पाहिले. तेथे जवळच बहिरोबाचे स्थान होते त्याला समर्थांनी नवस केला, "माझ्या कल्याणाला उतार पडू दे, तुला मणभर गूळ देऊ."

नंतर कल्याणस्वामींच्या तब्येतीस उतार पडण्यासाठी जवळ जाऊन त्यांच्या अंगावरुन हात फिरवला. तेव्हा ते सावध झाले आणि त्यांनी समर्थांच्या चरणांवर मस्तक ठेवले.

नंतर समर्थांनी सर्पाकडे पाहून त्याला म्हटले, "आमची मंडळी येथून रात्री-अपरात्रीची फिरते, ह्याकरीता आपण यापुढे येथे राहू नये. दुसरी जागा पाहून तिकडेच राहावे."

अशी आज्ञा होताच सर्पाने फणा काढला व समर्थांना प्रदक्षिणा घालून तो निघून गेला. मग

# संस्कार

एक मुलगा होता. तो खूपच सरळमार्गी आणि प्रामाणिक होता. त्याच्यावर त्याच्या आईवडीलांनी चांगले संस्कार केले होते. त्या संस्कारांना अनुसरुन तो वागत होता. एकदा काही निमित्ताने तो शेजाऱ्यांच्या घरी गेला. शेजारी कुठेतरी बाहेर गेला होता. शेजाऱ्याच्या नोकराने मुलाला बसायला सांगितले आणि नोकर निघून गेला. मुलगा जिथे बसला होता तिथे जवळ एका टोपलीत उत्तम दर्जाची सफरचंदे ठेवली होती. त्या मुलालाही सफरचंद खूप आवडत असत; पण त्याने सफरचंदाना हात लावला नाही. तो शेजाऱ्याची वाट पाहत बसला होता. बऱ्याच वेळाने शेजारी घरी परतला त्यावेळी त्याने पाहिले, की मुलगा बसला आहे. त्याच्या शेजारी सफरचंदे असूनही तो त्यांना हातसुध्दा लावत नाही.

मुलाला सफरचंद खूप आवडतात हे शेजाऱ्याला माहित होते. शेजारी येताच मुलाने उठून नमस्कार केला. शेजाऱ्याने त्याला जवळ घेतले व विचारले, "तुला सफरचंद तर खूप आवडतात ना. मग तरीसुध्दा एकही सफरचंद उचलून का खाल्ले नाहीस?" मुलगा म्हणाला, "इथे कोणीच नव्हते. मी दोन-तीन सफरचंदे जरी उचलून घेतली असती तरी कुणालाच कळले नसते. कोणीच मला पाहत नव्हते; पण कोणी पाहत नव्हते पण मी स्वत: ते पाहत होतो. मी स्वत:ला फसवू शकत नाही."

शेजाऱ्यास त्याच्या या बोलण्याचा आनंद वाटला. त्याने त्याला शाबासकी दिली व म्हणाला, "आपण जे करतो ते परमात्मा पाहत असतो. आपण आपल्याला कधीच फसवू शकत नाही. दुसऱ्याला लाख फसवू पण स्वत:शी खोटे बोलणे फार अवघड आहे. खरंच, सर्वांनीच तुझ्यासारखं वर्तन केल्यास जग सुखी होईल."

तात्पर्य : लहानपणीच मुलांना खोटे वागणे, बोलणे यापासून दूर ठेवल्यास मुले भविष्यात योग्य वर्तन करतील. वाईट गुण घेण्यास क्षणाचाही विलंब लागत नाही पण चांगले शिकण्यास खूप काळ जावा लागतो. मुले वाईट वर्तनाची निघाल्यास त्याचा दोष आईवडीलांना येतो.

❑❑❑

समर्थ सर्वांना घेऊन आपल्या ठिकाणी आले. पण कल्याणस्वामी म्हणाले, "मी चाफळास जाऊन पाने घेऊन येतो."

त्यांना समर्थांनी सांगितले, "तू जाऊ नको. पाने नसली तरी चालतील. पानासाठी जीव काय म्हणून धोक्यात घालता?"

कल्याणस्वामी म्हणाले, "जीवाचे जामीन आपण, मला कशाची काळजी?"

एवढी भक्ती पाहून समर्थ म्हणाले, "बरे जा, पाहा बटवीत पाने असली तर विडा द्या. नाहीतर गरज नाही."

कल्याणस्वामींनी बटवीत पाहिले तर तो पाने भरलेली आहेत. मग त्यांनी मोठ्या आनंदाने विडा आणून समर्थांना दिला. ते पाहून समर्थांनी सर्व शिष्यांना सांगितले, "ही कल्याणाची भक्ती पाहा. भक्तीमुळे कोणाचीही मर्जी प्रसन्न होते. ह्याकरिता आपण दुसऱ्याचा हेवा करु नये. त्याच्या भक्तीप्रमाणे भक्ती करण्यास शिकावे म्हणजे झाले."

❍ क्रमश:



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा







व्वा ! इथे किती छान वातावरण आहे.
दुपारनंतर
किट्टी तुमच्या घरी आली आहे का ?
नाही, ती आमच्या घरी नाही आली.
संध्याकाळी
किट्टी बाळ ! बघ मी तुझ्यासाठी काय आणलं आहे.


किट्टी सकाळीच बाजारात सामान आणायला गेली. अजूनपर्यंत घरी आली नाही. माहीत नाही कुठे राहिली.
चल, आपण आताच किट्टीला शोधायला जाऊया.
आपण सर्व किट्टीला शोधायला जाऊया.
आपण वेगवेगळ्या जागेवर जाऊन किट्टीला शोधूया.
किट्टी बेटा! काय झालं? तू इथे काय करतेस?


किट्टी, तू इथे बसली आहेस ? आम्ही सर्वजण किती चिंतेत होतो. पण तू इथे का बसली आहेस ?
बाबा ! मला आता घरी जायचं नाही आहे.
पण का बेटा ? काय तुझी आई तुझ्याकडून काम करुन घेते म्हणून ?
बाळ, आई-वडील आपल्या मुलांनी काम शिकावे म्हणून त्यांच्याकडून कामं करुन घेतात, जेणेकरुन भविष्यात ते आपल्या पायावर उभे राहू शकतील.
आई, मला माफ कर. ह्यापुढे अशी चूक होणार नाही. मी तुझं सर्व काही ऐकत जाईन.

# वाढदिवसाच्या












हार्दिक शुभेच्छा







ह्या जन्मदिनाच्या शुभक्षणांनी
आपली सारी स्वप्नं साकार व्हावी
हा वाढदिवस आपल्यासाठी
एक अनमोल आठवण ठरावी...








कथा

# मनाची एकाग्रता

एकेकाळी एक वृध्द योध्दा होता. त्या काळातील तो सर्वत्र सुप्रसिध्द असा योध्दा होता. त्याला युध्दात कुणीच हरवू शकत नसे. त्याची ख्याती सर्वत्र पसरली होती. त्याने त्याच्या शिष्यांना व मुलांना युध्दकलेचे शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. त्याचवेळी शेजारच्या नगरीतला एक तरुण योध्दा आला. तोही प्रसिध्द योध्दा होता. अनेक पराक्रमी योध्देही त्या तरुण योध्द्यासमोर हार मानत असत. प्रतिस्पर्ध्याचे कच्चे दुवे ओळखून त्याला सहज पराभूत करण्यात त्याचा हातखंडा होता.

अतिशय कमी कालावधीत त्याने सर्व योद्ध्यांना पराभूत केले होते. त्याचे नाव सर्वत्र गाजू लागले. मिळणाऱ्या प्रसिध्दीमुळे आता त्याच्या मनात अहंकार जागृत झाला. त्याने विचार केला, की या वृध्दालाही हरवून अजिंक्य

योध्दा हे बिरुद लावून आपण मिरवू. त्याने वृध्द योद्ध्याला युध्दाचे आव्हान दिले. शिष्यांनी मनाई केली तरी वृध्दाने त्याचे आव्हान स्वीकारले. तरुण योध्दा ठरलेल्या दिवशी वेळेवर रणांगणात येऊन उभा राहिला. भविष्यातील विजयाची कल्पना मनात धरुन तो आनंदी होत होता. पण वृध्द मात्र शांत आणि संयमित स्थितीमध्ये त्याच्यासमोर उभा होता. युध्द सुरु झाले. तरुणाच्या प्रत्येक वाराला वृध्दाकडे प्रतिवार तयार होता. तरुण योध्दा हळूहळू का होईना दमू लागला आणि आपण युध्द हरतो आहे हे लक्षात येताच त्याने वृध्दाला अपशब्द वापरण्यास सुरुवात केली. जेणेकरुन वृध्दाचे लक्ष विचलित होईल; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. वृध्द योध्दा अविचल राहिला. त्याचा संयम ढळला नाही. अखेरीस तरुण योध्दा पराजित झाला. त्याने स्वत:हून हार पत्करली व तेथून पराजित होऊन निघून गेला. तो गेल्यावर शिष्यांनी त्याला विचारले, “गुरुदेव, तो तरुण तुम्हाला अपशब्द वापरत होता तरी तुम्ही शांत कसे राहिलात?” तेव्हा वृध्द गुरु म्हणाला, “मुलांनो कोणत्याही युध्दात शारीरिक बळाबरोबरच मनाची एकाग्रता महत्त्वाची असते. कोणत्याही परिस्थितीत मन कणखर असेल तर तुमचा विजय निश्चित आहे. कुठल्याही स्थितीत मनाचा संयम ढळू देऊ नये.”

**तात्पर्य :** मनाची एकाग्रता साधल्याने बरीचशी कामे साध्य होतात. मन एकाग्र करुन कोणतंही काम केल्यास हमखास यश मिळतेच.

□□□

## प्रिय आम्हाला हसती दुनिया

प्रिय आम्हाला हसती दुनिया
सर्वांनी नेहमी वाचू या

दोन शब्दात अर्थ भरला
गर्व अहंकार दूर सरला
कथा वाचून झालं ज्ञान
लुप्त झालं सारं अज्ञान
पौराणकि कथा सुंदर छान
हरपलं सारं देह भान
दादा देई सल्ला खास
दवडू नका फुका श्वास
विचार पुष्पानं समज आली
ज्ञानमय काया झाली
तेजस्विनीची उंच भरारी
शौर्याची ही महती न्यारी
दिव्यवाणीत रहस्य दडलं
परोपकारी जीवन घडलं
सर्वांगसुंदर हसती दुनिया
सर्वांनी नियमित वाचूया

कवीता : संजीवनी जिडगे
किल्लारी -लातूर

# नागपूर

मुख्यालय : नागपूर

तालुके : नागपूर (शहर), नागपूर (ग्रामीण), सावनेर, पारशिवनी, रामटेक, मौदा, कामठी, कुही, भिवापूर, उमरेड, हिंगणा, काहोल, नरखेड, कळमेश्वर

नद्या : जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर वर्धा, पूर्वसीमेवरुन वैनगंगा तसेच जाम, वेणा, कन्हान, पेंच, कोलार, नाग, सांड, नांद, आंब, बानवथंडी

खनिजे : मॅगनीज, अभ्रक, लोखंड, दगडी कोळसा, चुनखडी, चिनीमाती तसेच बांधकामासाठी लागणारा दगड

प्रमुख शेतकी उत्पादने : मुख्य पीक ज्वारी, गहू, मिरची, कापूस, भात, डाळी, भुईमूग, संत्र्यांसाठी हा जिल्हा प्रसिध्द आहे.

धरणे : पेंच प्रकल्प

## विशेष माहिती :

❒ नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असून तेथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन भरते.

❒ नागपूर शहर 'नाग' नदीच्या काठी वसलेले आहे म्हणून त्याला नागपूर असे नाव पडले.

❒ १४ ऑक्टोबर,१९५६ रोजी दसऱ्याच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो दलित बांधवांसमवेत नागपूर येथे 'बौद्ध धर्म' स्वीकारला. त्या स्थळाला दीक्षाभूमी म्हटले जाते.

❒ नागपूर जिल्ह्यात रामटेक येथे महाकवी कालिदासांचे अष्टकोनी वर्तुळात्मक स्मारक आहे.

❒ नागपूर जिल्हा हा संत्र्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. नरखेड, काटोल, मोहपा, कोंढारी, कळमेश्वर या संत्र्यांच्या बाजारपेठा आहेत.

❒ नागपूर हे संपूर्ण भारताचे मध्यवर्ती ठिकाण आहे.

❒ डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (१९२५) नागपूरात स्थापना केली. नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर डॉ. हेडगेवार यांचे संगमरवरी स्मारक उभारण्यात आले आहे.

❒ नागपूर जिल्ह्यातील उत्तरेकडील डोंगराळ भागात गोंड, हळवी ह्या आदिवासी जमाती आढळतात.

❒ विदर्भातील सर्वात महत्त्वाचा औद्योगिक जिल्हा म्हणून नागपूर जिल्ह्यास ओळखले जाते.

❒ संस्कृत भाषेच्या प्रचार-प्रसारार्थ राज्यात नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथे कवी कुलगुरु कालिदास विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे.

❒ भारतातील तिसरे व महाराष्ट्रातील पहिले 'पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ' ३ डिसेंबर २००० रोजी नागपूर येथे स्थापन करण्यात आले आहे.

❒ नागपूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ आहे.

❒ डिसेंबर २००४ मध्ये नागपूर विद्यापीठास 'संत तुकडोजी महाराज विद्यापीठ' असे नाव देण्यात आले आहे.

❒ नागपूर विमानतळाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नाव देण्यात आले आहे.

❒❒❒

कथा - भरत मारुती चौगले (भुदरगड-कोल्हापूर)

# सुखाचा शोध

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. रामधन नावाचं अगदी लहानसं खेडेगाव. जेमतेम तीनशे लोकवस्तीचं. त्या गावात दामोदर नावाचा एक गरीब गृहस्थ राहत होता. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यामुळे आपल्या दरिद्रीपणाला तो फार कंटाळून गेला होता. अशाच एके दिवशी तो सुखाच्या शोधात घराबाहेर पडला. त्याच्या गावापासून अगदी थोड्याच अंतरावर असणाऱ्या रामपूर या गावी एक साधू राहत होते. दामोदर त्यांच्या कुटीवर गेला. साधू ध्यानामध्ये मग्न होते. साधूचे ध्यान संपल्यावर दामोदर त्यांना शरण गेला.

दामोदरने आपल्या दरिद्री आयुष्याचा पाढा साधूपुढे वाचला व सुखी होण्याचा सन्मार्ग विचारला. साधूने दामोदरला सुखी होण्यासाठी देवाची भक्ती करण्याचा कानमंत्र दिला. दामोदर तेथून निघाला व थेट आपल्या गावी आला. कुटुंबात राहून देवाची अपार भक्ती करु लागला.

दामोदरची अतूट भक्ती पाहून देव प्रसन्न झाला व स्वप्नात त्याला साकार रुपात दर्शन दिले. देवाच्या साक्षात दर्शनाने दामोदर सुखावला. देव दामोदरला म्हणाला, "भक्ता, तुझी माझ्यावरील भोळी भक्ती पाहून मी खूश झालो आहे. तुला काय हवं ते माग." दामोदरने देवाजवळ पैसा आणि समाधान अशा दोन गोष्टींची मागणी केली. त्यावर देव म्हणाला, "तुला या दोन गोष्टींपैकी फक्त एकाच गोष्टीची मागणी करावी लागेल. कारण जर मी तुला पैसा दिला तर तुला सुख मिळेलच असे मी सांगू शकत नाही आणि मी जर तुला समाधान दिले तर तू सुखी मात्र नक्कीच होशील." यावर दामोदरचे डोळे उघडले. खरे सुख कशात आहे हे त्याला समजले. त्याने देवाजवळ पैशाची मागणी न करता केवळ समाधान या एका गोष्टीची मागणी केली.

भक्ताची ही समज व परिपूर्ण अवस्था पाहता देवाने खूश होऊन आशीर्वाद दिला. दामोदरला मानवी जीवनाचे मर्म समजले व मानवी जीवनातील खरे सुख कशात आहे हे समजले.

❑❑❑

## भक्त

प्रभू परमात्म्याची ओळख करुन त्याला मानणारा भक्त सदैव पवित्र जीवन जगतो. तो कुणालाच दु:ख देत नाही. तो स्वत:देखील सुखी राहतो व इतरांनादेखील सुखी ठेवण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतो.

- बाबा हरदेवसिंहजी महाराज

# सामान्य ज्ञान



१) मे महिन्याचा पहिला रविवार हा कोणता दिन म्हणून साजरा करतात ?

अ) मदर्स डे ब) जागतिक हास्यदिन क) महाराष्ट्र दिन ड) मराठी भाषा दिन

२) देशात आकारमानाप्रमाणे महाराष्ट्र राज्याचा .......... क्रमांक लागतो.

अ) पहिला ब) दुसरा क) तिसरा ड) चौथा

३) '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

अ) स्वा. सावरकर ब) ने. सुभाषचंद्र बोस क) लो. टिळक ड) म. गांधी

४) कृष्णकुमारी कोल्ही या पहिल्या हिंदू महिला खासदार कोणत्या देशातील संसदेत आहेत ?

अ) इजिप्त ब) पाकिस्तान क) अफगाणिस्तान ड) इराण

५) कोणत्या देशात सर्वाधिक वाघ आढळतात ?

अ) चीन ब) भारत क) रशिया ड) सायबेरिया

६) १२ मे हा 'जागतिक परिचारिका दिन' कोणाच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो ?

अ) फ्लॉरेन्स नाईटिंगल ब) हेलन केलर क) मादाम कामा ड) मदर तेरेसा

७) आगाखान कप कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?

अ) क्रिकेट ब) हॉकी क) फुटबॉल ड) हॉलीबॉल

८) 'अष्टाध्यायी' या ग्रंथाचे रचनाकार कोण आहेत ?

अ) महर्षी व्यास ब) महर्षी चरक क) महर्षी पाणिनी ड) महर्षी याज्ञवल्क्य

९) अलीकडेच इस्त्रोने 'जीसॅट ६ ए' हा अत्याधुनिक उपग्रह अवकाशात पाठवला. त्याचे वजन किती किलो आहे ?

अ) २१४० ब) १२४० क) ४५४० ड) २२४०

१०) १४ मे १६५७ रोजी छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म कोणत्या किल्ल्यावर झाला ?

अ) शिवनेरी ब) रायगड क) पुरंदर ड) राजगड

उत्तरे इतरत्र





# नाजूक चणीचा कुरव

**सूरय** या नावानेही ओळखला जाणारा हा कुरव पक्षी. त्याला इंग्रजीत 'गल' असं म्हटलं जातं. हा एक अतिशय सुंदर असा समुद्रपक्षी आहे. या पक्ष्याच्या अनेक प्रजाती आहेत. डोक्यावरील भागाच्या वेगवेगळ्या रंगांनुसार या प्रजातींची नावे असून, पलास गल, ब्राऊन हेडेड गल, पॅसिफिक गल, रिंग बिल्ड गल या त्यातील काही महत्त्वाच्या प्रजाती आहेत. अमेरिका, युरोप, आफ्रिका आणि आशिया खंडात हा पक्षी आढळतो. भारतातील सर्व समुद्री भागात हा आढळतो.

नाजूक चणीचा व सुंदर दिसणारा कुरव पक्षी त्याच्या शुभ्र पांढऱ्या रंगामुळे लक्षात राहतो. कुरव पक्ष्याचा डोक्याचा रंग कोणताही असला, तरी पोट व पाठ पांढऱ्या व राखाडी रंगाची असते. याचं वैशिष्ट्य म्हणजे आकड्याप्रमाणे आत वळलेली पिवळसर रंगाची अणकुचीदार चोच. ही चोच फार मजबूत असते व त्यामुळे समुद्रातील प्राणी पकडणं त्यांना सोपं जातं. चोचीच्या या आकारामुळे अन्नावरची पकड मजबूत राहते. हे पक्षी ज्या ठिकाणी उडतात, त्याच ठिकाणी अन्न शोधतात. समुद्रातील मासे, पाण्यावर उडणारे किडे, कीटक, अळ्या, बेडूक, खेकडे हे त्यांचं मुख्य खाद्य आहे.

हेरिंग नावाचे गल (कुरव) तर दुसऱ्याचं अन्न चोरण्यातही तरबेज असतात. पाण्याखाली खोल सूर मारुन अन्न मिळवण्याची क्षमता या पक्ष्यात नसते. प्रजातीनुसार त्यांच्या आकारात व वजनात फरक दिसून येतो. हे पक्षी थव्याने राहतात व थव्यानेच स्थलांतर करतात. अतिशय थंड प्रदेशात राहणाऱ्या कुरव पक्ष्याच्या काही प्रजाती कडाक्याची थंडी सुरु झाली, की भारतातील उबदार वातावरण असलेल्या प्रदेशात स्थलांतर करतात. प्रचंड आवाजात कलकलाट करणाऱ्या या पक्ष्यांचा थवा लगेच ओळखता येतो. हा पक्षी अत्यंत कर्कश आवाजात ओरडतो.

हे पक्षी इतर समुद्रीपक्ष्यांप्रमाणे जमिनीवरच घरटं तयार करतात. पाणवनस्पती व गवतापासून ते घरटं तयार करतात. आयुष्यभर एकाच जोडीदारासह राहणारा हा पक्षी आहे. प्रजननाच्या काळात मादी पांढऱ्या-राखाडी रंगाची दोन ते पाच अंडी घालते. दोन ते तीन आठवड्यांनी पिल्लू अंड्यातून बाहेर येतं. नर व मादी दोघे मिळून या पिल्लाचं संगोपन व संरक्षण करतात.

माणसाच्या सहवासात रमणारा हा पक्षी असून निडर व आक्रमक स्वभावाचा असतो. काही जातींचे कुरव पक्षी जिवंत देवमाशाच्या अंगावर बसून त्यांचे छोटे लचके तोडायलाही मागेपुढे बघत नाही.

❒ संग्राहक : अंकित जाधव




# दिव्यत्वाची प्रचिती

सत्कार्यात नेहमी विघ्ने फार. त्यामुळे समाजसुधारकांच्या कार्यात सदैव अडथळे अपार. महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुले यांचे स्त्री-शिक्षणाचे, अस्पृश्यता निवारणाचे व सत्यधर्माचे कार्य अनेक लोकांना आवडत नव्हते. अशा विरोधकांनी एकदा रोडे व कुंभार नावाचे दोन मारेकरी जोतिबांच्या घरी त्यांना मारावयास पाठवले. रात्रीची वेळ. दोघांच्या हातात तळपत्या तलवारी; पण त्यांच्या पावलांच्या आवाजाने जोतिबांना जाग आली. दिव्याच्या मंद प्रकाशात पाहतात तो साक्षात दोन यमदूत समोर उभे. "आपण कोण? कशासाठी आला आहात? मला मारण्याएवढा माझ्याकडून काही अपराध घडला आहे का?" जोतिबांनी त्यांना विचारले, "तुम्हाला ठार मारल्यास आम्हाला प्रत्येकी दहा दहा हजार रुपये मिळणार

आहेत," मारेकरी म्हणाले. जोतिबा त्यावर म्हणाले, "माझ्या मृत्यूमुळे तुमचा फायदा होत असेल तर माझे मस्तक तुमच्या पुढे आहे, चालवा आपली तलवार. ज्या गरिबांची मी सेवा करतो. ज्यांची सेवा करणं हाच मी धर्म समजतो. त्यांच्याकडून मरण येणं यासारखी भाग्याची गोष्ट नाही! माझे जीवन गोरगरिबांसाठीच आहे." त्यांच्या त्या बोलण्याने, दिव्यत्वाच्या दर्शनाने मारेकऱ्यांमधील चांगुलपणा जागृत झाला. त्या निश्चिंत व निर्भय महात्म्याच्या पायी पडून ते म्हणाले, "आम्हाला क्षमा करा." हे दोघे मारेकरी पुढे त्यांचे भक्त झाले. एक बनला त्यांचा अंगरक्षक तर दुसरा त्यांच्याच शाळेत शिकून पंडित झाला. प्रत्यक्ष जणू मृत्यूशी संवाद घडून महात्मा फुले यांच्या तत्त्वांची व सत्त्वाची जणू कसोटी लागली. जोतिबा त्या कसोटीला उतरुन मृत्युंजय महात्मा ठरले.

**तात्पर्य :** मनोबल व नैतिक धैर्य ही संकटातून बाहेर काढणारी दुधारी शस्त्रे आहेत. प्रीती मन फुलवते, तर सेवा जग फुलवते, सेवेतून माणसाला आंतरिक सामर्थ्य प्राप्त होते. धैर्य म्हणजे मनुष्याजवळ असणारे खरे शौर्य. जो धैर्यवान आहे, त्याच्यातील सत्वगुण कधी कमी होत नाहीत. मनाच्या निर्मळतेशिवाय निर्भयता उत्पन्न होत नाही. शौर्य किंवा पौरुष्य यांचे निवासस्थान म्हणजे शुध्द अंत:करण होय.

# वाचकांचे मनोगत

दासी खूप वर्षांपासून हसती दुनिया वाचत आहे. हसती दुनिया या मासिकातून खूप काही शिकायला मिळते. त्यातील वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी वाचून आपणास चांगला बोध मिळतो आणि शब्दकोडे सोडवून सामान्य ज्ञानही वाढते. याचप्रकारे दासीला मासिकातील इतर साहित्य जसे दोन शब्द, विचार पुष्प, दादाला विचारु या, दिव्यवाणी इत्यादी वाचायला आवडते. हसती दुनिया हे मासिक वाचून मुलांवर चांगले संस्कार घडतात व ते सत्संगशी जुडले जातात.

मागील नोव्हेंबर २०१७ ची हसती दुनिया वाचताना आ. श्री. राजेंद्र थोरात यांनी ज्या संस्कारदीप पुस्तकाची समिक्षा लिहिली होती ती वाचायला मिळाली. तसेच त्यांच्या अजून दोन पुस्तकांबद्दल 'छोट्या गोष्टी मोठे बोध' तसेच 'संस्कारधन' या पुस्तकांबद्दलही माहिती मिळाली. म्हणून रविवारी मी चेंबूरला सत्संगला गेले तेव्हा या तिन्ही पुस्तकांची खरेदी केली आणि वाचल्यानंतर मन प्रसन्न झाले. हे पुस्तक ज्ञानाचे भांडार आहे. जेव्हा मी पुढील रविवारी संगतला जाईन तेव्हा या पुस्तकांच्या अजून प्रती खरेदी करेन. जेणेकरुन सोसायटीमधील मुलांच्या वाढदिवसाला भेट म्हणून देता येईल.

❑❑❑

## चित्र काढा आणि रंग भरा



### सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) क
३) अ
४) ब
५) ड
६) अ
७) ब
८) क
९) अ
१०) क

## शब्दकोडे १६६

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | क | रा | | लं |
| कुं | भ | क | र्ण | | ट | का |
| ती | | ब | | ता | क | |
| | प | र | शु | रा | म | |
| | श्चि | | | म | क | र |
| अ | म | रा | व | ती | | त्ला |
| नि | | व | | | | गि |
| ल | क्ष | ण | | गां | धा | री |



।। तू ही निरंकार ।।
ना चिंता हो, ना भय हो...
केवळ "सद्गुरू माता सविंदर हरदेवजी महाराज" की जय हो....!
महालक्ष्मी
सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...
लग्न बस्त्याची खास सोय !
शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका
अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन
THE COMPLETE FAMILY SHOWROOM
मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते
सद्गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...
सद्गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है
९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

